NAGPUR CITY POLICE COMMISSIONERATE

नागपूर शहर पोलीस आयुक्तालय

(पोलीस वार्तापत्र)

(दुपार)

दिनांक २४.१०.२०२६ शनिवार

(कामगिरी)

१) नागपूर शहर पोलीसांची म.दा.का., जुगार व मोटर वाहन कायद्याअंतर्गत करण्यात आलेली कारवाई :–

दिनांक २३.१०.२०२६ रोजी, नागपूर शहर पोलीसांनी सर्व पोलीस ठाणे हद्दीत, म.दा.का. कायद्यान्वये ११ केसेसमध्ये १४ ईसमावर कारवाई करून एकुण १,६०,६१०/–रू. चा मुद्देमाल जप्त केला. जुगार कायद्यान्वये ०३ केसमध्ये ०६ ईसमांवर कारवाई करून एकुण १,७९५/–रू. चा मुद्देमाल जप्त केला. दिनांक २३.१०.२०२६ चे २३.०० वा. ते दिनांक २४.१०.२०२६ चे ०५.०० वा. चे दरम्यान, केलेल्या रात्रगस्तीमध्ये **कलम १३५ म.पो. का. कायद्यान्वये ०१ इसमावर** कारवाई करण्यात आलेली आहे.

वाहतुक शाखा पोलीसांनी मोटार वाहन कायद्यान्वये, ओव्हरस्पीड वाहन चालविणे कलम १८४ मोवाका २७ केस, सिग्नल जंपींग कलम २३९/१७७ मोवाका अन्वये ५९ केसेस, विना परवाना वाहन चालविणे कलम १३० मोवाका अन्वये ८८ केसेस, ऑन रोड पार्कींग कलम १२२/११७ मोवाका अन्वये २५८ केसेस, रॉग साईड कलम ४/१२२ मोवाका अन्वये ९३ केसेस, अवैध प्रवासी वाहतुक कलम १९४(ए) मोवाका अन्वये ९४ केसेस, ड्रायव्हींग विदाऊट युनिफार्म कलम २१/१८ मोवाका अन्वये १०३ केसेस, ट्रिपलसिट वाहन चालविणे कलम १२८/१७७ मोवाका अन्वये ८७ केसेस, धोकादायकरित्या बेदरकारपणे वाहन चालविणे कलम १८४ मोवाका ०८ केस, फॅन्सी नंबरप्लेट कलम ५१/५० सीएमव्हीआर अन्वये १८ केसेस, विदाऊट सिटबेल्ट ड्रायव्हींग कलम १९४ बी(१) मोवाका अन्वये ०६ केसेस, विना हेल्मेट गाडी चालविणे कलम १२९/१७७ मोवाका अन्वये ९६० केसेस, वाहन चालवितांना भ्रमणध्वनीचा वापर करणे १२ केस, ड्रंकन ड्राईव्ह कलम १८५ मोवाका अन्वये १७ केसेस व इतर कलमांखालील वेगवेगळे गुन्हे असे एकुण २,०१० वाहन चालकांवर कारवाई करून त्यांचेकडून एकूण रू. ८,०३,१५०/–रू. इतके तडजोड शुल्क वसूल केले आहे.

वरील सर्व मोहीम एकत्रितरित्या नागपूर शहर पोलीसांतर्फे राबविण्यात आल्या असून, यापुढेही प्रभावीपणे कारवाई करण्यात येणार आहे. वाहन चालकांनी वाहन चालवितांना वाहतुकीचे नियम पाळुन वाहनासंबंधी सर्व कागदपत्रे जवळ बाळगावित, असे नागरीकांना आवाहन करण्यात येत आहे.

२) वाडी पोलीसांची कामगिरी :– हद्दपार ईसमास अटक.

दिनांक २३.१०.२०२६ चे २१.५५ वा. चे सुमारास, वाडी पोलीसांचे बिट मार्शल हे पोलीस ठाणे हद्दीत पेट्रोलींग करीत असता, त्यांना माहीती मिळाली की, हद्दपार इसम नामे प्रितम उर्फ सिंधु उर्फ यश शर्मा हा रोहीत बार समोर, एमआयडीसी टि–पॉईंट, वाडी येथे फिरत आहे. अशा खात्रीशीर माहीतीवरून, नमुद ठिकाणी जावुन पाहणी केली असता, प्राप्त वर्णनाचा ईसम दिसुन आला. त्याचे जवळ जात असता, तो पोलीसांना पाहुन पळु लागला. त्याचा पाठलाग करून, त्यास ताब्यात घेतले. पंचासमक्ष त्याचे नाव पत्ता विचारले असता, त्याने त्याचे नांव प्रितम उर्फ सिंधु उर्फ यश उमाशंकर शर्मा, वय २९ वर्षे, रा. दुध डेअरी जवळ, सम्राट अशोक चौक, आंबेडकर नगर, कंट्रोलवाडी, वाडी, नागपुर असे सांगीतले. त्यास पोलीस ठाणे येथे आणुन त्याचा गुन्हे अभिलेख

तपासला असता, त्यास पोलीस उप आयुक्त परिमंडळ क्र. ०१ यांचे हद्दपार आदेश क्र. ३७२६/२०२४ दिनांक १२.११.२०२४ अन्वये नागपुर शहर व ग्रामीण हद्दीतुन ०२ वर्षाकरीता हद्दपार केल्याचे दिसुन आले. आरोपी हा हद्दपार असतांना कोणतीही परवानगी न घेता पोलीस ठाणे हद्दीत कोणतातरी गुन्हा करण्याचे उद्देशाने समक्ष मिळुन आल्याने व त्याने मनाई आदेशाचे उल्लंघन केल्याने, पोलीस ठाणे वाडी येथे आरोपीविरूध्द कलम १४२ म.पो.का. अन्वये गुन्हा दाखल करून, आरोपीस अटक केली आहे. पुढील तपास सुरू आहे.

वरील कामगिरी मा. श्री. वसंत परदेशी अपर पोलीस आयुक्त (दक्षिण प्रभाग) नागपूर शहर, मा. श्री. सिंगारेड्डी ऋषीकेश रेड्डी, पोलीस उप आयुक्त (परि.क्र. १), मा. श्री. यशवंत नलावडे, सहा. पोलीस आयुक्त (एमआयडीसी विभाग) यांचे मार्गदर्शनाखाली, वपोनि. नितीन मगर, मपोउपनि. उमा कोटमे, पोहवा. चंद्रकुमार टेकाम व पोअं. शोभित वर्मा यांनी केली.

(गुन्हे)

१) पोलीस ठाणे यशोधरानगर :– प्राणांतिक अपघात करणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा दाखल.

दिनांक २३.१०.२०२६ चे ०८.१० वा. चे सुमारास, ईसम नामे शेख समीर शेख सुभान, वय ४६ वर्षे, रा. राजीव गांधी नगर, शितला माता मंदीरजवळ, यशोधरानगर, नागपुर हे पोलीस ठाणे यशोधरानगर हद्दीतील चिखली पुलाचे बाजुला राजीव गांधी नगरकडे जाणारे रोडवरुन जात असता, त्यांना एका काळ्या रंगाचे कार चालकाने त्याचे ताब्यातील कार भरधाव वेगाने, हयगयीने व निष्काळजीपणे चालवुन, धडक देऊन, गंभीर जखमी केले. गंभीर जखमी ईसमास उपचाराकरीता मेयो हॉस्पिटल येथे नेले असता, डॉक्टरांनी त्यांना तपासुन मृत घोषित केले.

याप्रकरणी फिर्यादी रामखिलावन बल्लु तांबे, वय ६० वर्षे, रा. राजीव गांधी नगर, गल्ली क्र. २४, यशोधरानगर, नागपूर यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे यशोधरानगर येथे सपोनि. गजानन तेलरांधे ९८२२५२८५७५ यांनी काळ्या रंगाचे अज्ञात कारचालक आरोपीविरूध्द कलम २८१, १०६(१) भा.न्या.सं. सहकलम १८४ मो.वा.का. अन्वये गुन्हा दाखल केला आहे. कारचालक आरोपीचा शोध व पुढील तपास सुरू आहे.

२) पोलीस ठाणे नवीन कामठी :– गोवंशीय जनावरांना निर्दयतेने व क्रुरपणे कत्तलीकरीता कोंडुन ठेवणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा दाखल.

दिनांक २३.१०.२०२६ चे १३.३० वा. चे सुमारास, नवीन कामठी पोलीसांना माहिती मिळाली की, पोलीस ठाणे हद्दीत आवडी जवळील कॅनाल परिसरात यशपाल शर्मा यांचे शेताजवळ काही गोवंशीय जनावरांना कत्तलीकरीता बांधुन ठेवले आहे. अशा मिळालेल्या खात्रीशीर माहितीवरून नमुद ठिकाणी जावुन पंचासमक्ष रेड कारवाई केली असता, त्या ठिकाणी एकुण ०८ लहान मोठी गोवंशीय जनावरे यांना अत्यंत क्रुरपने व निर्दयतेने दाटीवाटीने कोंडून चारापाणी न देता बांधून ठेवलेले दिसुन आले. नमुद जनावरांचे मालकाबाबत माहिती काढली असता, त्यांना कत्तलीकरीता बांधुन ठेवल्याचे निष्पन्न झाले. घटनास्थळावरून एकुण ०८ गोवंशीय जनावरे किंमती अंदाजे १,६०,०००/–रू. चा मुद्येमाल जप्त करण्यात आला आहे. नमुद गोवंशीय जनावरे यांना गौशाळा पशुपालन बहुउद्येशीय संस्था, बिडगाव, भांडेवाडी येथे दाखल करण्यात आले आहे.

याप्रकरणी सरतर्फे फिर्यादी पोअं. सचिन पाटील, पोलीस ठाणे नवीन कामठी यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे नवीन कामठी येथे अज्ञात आरोपीविरूध्द कलम ५(ब), ९(अ) महाराष्ट्र प्राणी संरक्षण अधिनियम–१९७६, सुधारणा कायदा १९९५, सहकलम ११(१)(ड) प्राणी क्रुरता अधिनियम–१९६० अन्वये गुन्हा दाखल केला आहे. आरोपीचा शोध व पुढील तपास सुरू आहे.

३) पोलीस ठाणे कपिलनगर :– घरफोडी करणारे विधीसंघर्षग्रस्त बालकांविरुध्द गुन्हा दाखल.

पोलीस ठाणे कपिलनगर हद्दीत, प्लॉट क्र. ६/१२, लेंडेनगर येथे राहणारे फिर्यादी प्रमोद झाडुजी नागभिडे, वय ५३ वर्षे यांचे राहते घरीच गोल्डी किराणा स्टोअर्स नावाचे दुकान आहे. दिनांक २३.१०.२०२६ चे ०५.०० वा. चे सुमारास, फिर्यादी आपले घरात झोपलेले असतांना, त्यांना दुकानाचे शटर वाजल्याचा आवाज आला. त्यांनी बाहेर येऊन पाहिले असता, दुकानाचे समोर एक मोपेड गाडी उभी असल्याचे व दुकानाचे शटर अर्धवट उघडे असल्याचे दिसले. त्यांनी आवाज दिला असता, एक इसम शटरच्या खालुन बाहेर येऊन पळुन गेला. त्याचवेळी दुकानात शिरलेला दुसरा व्यक्ति बाहेर येऊन पळण्याचे तयारीत असता, त्यास फिर्यादीने पकडले. त्यावेळी त्या ईसमाने त्याचे हातातील चाकुने फिर्यादीचे अंगावर वार करुन जखमी केले व त्याचे दुचाकी ॲक्सेसने पळुन जाण्याचे तयारीत असता, फिर्यादीने त्यास पकडण्याचा प्रयत्न केला. दरम्यान तो गाडीसह खाली पडला. फिर्यादीने आरडाओरडा केली असता, लोकांनी नमुद इसमास पकडुन पोलीसांचे ताब्यात दिले. पोलीसांनी पकडलेल्या इसमास त्याचे नांव पत्ता विचारले असता, तो विधीसंघर्षग्रस्त बालक असल्याचे निष्पन्न झाले. विधीसंघर्षग्रस्त बालकास पळुन गेलेल्या इसमाबाबत अधिक विचारपुस केली असता, तो त्याचा साथीदार असुन, तोसुध्दा विधीसंघर्षग्रस्त बालक असल्याचे निष्पन्न झाले. फिर्यादीचे उपचारानंतर त्यांचे दुकानाची पाहणी केली असता, दुकानाचे गल्ल्यातील १३००/–रू. चोरी झाल्याचे दिसुन आले.

याप्रकरणी फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरुन पोलीस ठाणे कपिलनगर येथे दोन्ही विधीसंघर्षग्रस्त बालक यांचेविरुध्द कलम ३०५(अ), ३३१(३), ११८, ३(५) भा.न्या.सं., सहकलम ४, २५ भा.ह.का., सहकलम १३५ म.पो.का. अन्वये गुन्हा दाखल केला आहे. पळुन गेलेल्या विधीसंघर्षग्रस्त बालकाचा शोध व पुढील तपास सुरु आहे.

स्वा/–
(अंकुश राठोड)
पोलीस उप निरीक्षक,
पोलीस जनसंपर्क अधिकारी,
नागपुर शहर.